राबोडी पोलीस ठाणे, ठाणे शहर

पत्ता- रुतुपार्क शॉपींग सेंटर, ठाणे भारत सहकारी बँकेच्या बाजुला, रुतुपार्क, ठाणे प., महाराष्ट्र,

पि.न.-४००६०१,

:- **प्रेसनोट** -: दिनांक:- १२/०७/२०२४

**ठाणे शहर पोलीस भरती २०२२-२३ दरम्यान साकेत पोलीस मैदान या ठिकाणी मैदानी चाचणी दरम्यान प्रतिबंधित केलेले औषध घेवुन मैदानी चाचणी देत असताना उमेदवार यास ताब्यात घेवुन सदर उमेदवाराविरुध्द गुन्हा दाखल केलेबाबत**

--------------------ooo--------------------

ठाणे शहर आयुक्तालय पोलीस भरती सन २०२२-२०२३ ची मैदानी चाचणी साकेत पोलीस मैदान या ठिकाणी दिनांक १९/०६/२०२४ पासुन पोलीस भरती प्रक्रिया चालु झाली असुन दिनांक १२/०७/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वा.सदरची प्रक्रिया चालु झाली असता सकाळी ०७:४५ वाजता डिटेल क्र.१६२० त्यामधील चेस्ट क्रमांक १६०११ ते १६०२० या डिटेलवर इन्चार्च मपोहवा/२४७७ साबळे नेम कोपरी पोलीस स्टेशन,ठाणेशहर या संपर्ण डिटेलला मैदानी चाचणीसाठी घेवुन जात असताना चेस्ट क्र.१६०११ व १६०१२ या दोन उमेदवाराना वॉशरूम साठी सोडले असता त्यांच्या पैकी चेस्ट क्र. १६०११ साहील सुरेश सानप यांने कोणतीतरी गोळी खाल्ली असल्याचे त्याच्यासोबत असलेल्या उमेदवार याने डिटेल इंन्चार्ज यांच्या निदर्शनास आणुन दिले. सदर उमेदवारास त्याबाबत विचारले असता 'अंगात कणकण येत असल्याने त्याने गावाकडुन मेडीकल मधुन आणलेली अंगदुखीची गोळी खाल्याचे सांगीतले'. परंतु त्याबदद्ल मपोहवा/साबळे यांना संशय आल्याने सदर बाबत त्यांनी श्री अरुण पाटील सहायक पोलीस आयुक्त यांना कळविले. त्यानी चेस्ट क्र.१६०१२ यांचेसोबत पोलीस हवालदार/५००८ सुभाष थोरात नेम- अंबरनाथ पोलीस स्टेशन यांना पाठवुन चेस्ट क्र.१६०११ यांने जी गोळी खाल्ली होती त्या गोळीचे नाव असलेले रॅपर शोधुन काढले. त्या रॅपरचे/ गोळीचे नाव Tab Jefcort 6 Mg असे असल्याचे दिसुन आल्याने त्यागोळी बाबत पोलीस भरती मैदाना वरील उपस्थित असलेले डॉ. शशिकांत भागवत यांना सदरचे रॅपर दाखवुन विचारले असता,त्यानी ते प्रतिबंधीत ड्रग असल्याचे सांगीतले.

त्या अनुषंगाने सदर उमेदवार नामे साहील सुरेश सानप वय १९ वर्ष राह.- मु.पो. पडळ, खटाव ते काळेढोण रोड, पडळ, ता. खटाव जिल्हा सातारा यांने पोलीस भरती प्रक्रीये दरम्यान प्रतिबंधित असलेले औषध Tab Jefcort 6 Mg चे सेवन केल्याने त्याचे विरूध्द बीएनएस कायदा कलम २२३, सह औषीधीद्रव्य व सौदर्य प्रसाधन अधिनियम १९४० चे कलम १८ (सी),२७ अन्वये राबोडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.६४१/२०२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वाल्मिक डाके नेम- राबोडी पोलीस स्टेशन हे करत आहे.

**सदरची कामगीरी श्री. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त सो,ठाणेशहर, श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, सह पोलीस आयुक्त सो ,ठाणे शहर , श्री. संजय जाधव ,मा.अपर पोलीस आयुक्त सो,प्रशासन ,ठाणेशहर,श्रीमती रुपाली अंबुरे मा. पोलीस उप आयुक्त सो, मुख्यालय ०१,ठाणेशहर, श्री. शशिकांत बोराटे मा. पोलीस उप आयुक्त सो, मुख्यालय ०२,ठाणेशहर, श्री. सुभाष बुरसे, मा.पोलीस उप आयुक्त सो ,परिमंडळ**

०१,ठाणे ,श्रीमती प्रिया ढाकणे,सहायक पोलीस आयुक्त सो नौपाडा विभाग,ठाणे, पोलीस निरीक्षक जी. एल. शेवाळे मानवी संसाधन विभाग,ठाणे शहर, यांचे मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री किशोर खरात, पोलीस उपनिरीक्षक डाके नेम राबोडी पोलीस स्टेशन, मपोहवा/२४७७ साबळे नेम- कोपरी पोलीस स्टेशन, पोलीस हवालदार/५००८ सुभाष थोरात नेम- अंबरनाथ पोलीस स्टेशन यांनी केलेली आहेत.